(Incharge)

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र | जिल्हा District: मुंबई | पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि मुंबई | पहिली खबर क्र. FIR No.: २७ | वर्ष Year: २०२५ | दिनांक Date: दि ०२/०९/२०२५

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. १९८८ — कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ........ तारीख पासून Date from: २३/०८/२५ वेळ Time: ११.००वा तारीख पर्यंत Date to: ०१/०९/२५ वेळ Time: १७.०५वा

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. — तारीख Date: ०२/०९/२०२५ वेळ Time: ०५.००वा

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ०१/२५ तारीख Date: ०२/०९/२०२५ वेळ Time: ०५.००वा

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी — लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, '१' परिमंडळ, कांदिवली (प.)

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: येथील चहाची टपरी — ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: श्री दानु भवरलाल प्रजापती
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: भवरलाल प्रजापती
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: २५ वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय — फोन नं. Phone No.: ९९२०९९९८५७
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........
(f) व्यवसाय Occupation: रेशन दुकान मॅनेजर
(g) धर्म Religion: हिन्दू — जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता Address ........ गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

टी/७, संत निवृत्ती, आरे रोड गोरेगाव (पू) मुंबई

रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR, 1-B to case diary.)

श्री. सचिन बळीराम आत्राम - वय ३८ वर्षे धंदा - नोकरी शिधावाटप - (निरीक्षक) उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, '१' परिमंडळ, कांदिवली (प.) मुंबई.

यातील फिर्यादी श्री दानु भवरलाल प्रजापती वय ४५ वर्षे, धंदा. राशनदुकानदार मॅनेजर, रा. डि. बी/७, संत निवृत्ती, आरे रोड, गोरेगाव (पू) मुंबई यांचा संगणकावर टंकलेखीत केलेला सोबत जोडलेला जबाब हेच सदर गुन्ह्यातील प्रथम खबर म्हणुन संबोधण्यात येत आहेत.

समक्ष

(हरिदास किल्लेदार)
सहायक पालीका आयुक्त
ला. प्र. वि. मुंबई

दानु भवरलाल प्रजापती
02/08/2024

जबाब दिनांक ०२/०९/२०२५

श्री. दानु भवरलाल प्रजापती, वय २५ वर्षे, धंदा - राशन दुकान मॅनेजर, शिधावाटप शॉप :- दुकान क्र. ०१ (२७ ग, १९८), फ्लायओवर सोसायटी, गोरेगाव मुलुंड लिंक रोड, गोरेगाव ईस्ट, मुंबई ४०००६३, राठी :- बी/७, संत निवृत्ती आरे रोड, गोरगाव ईस्ट, मुंबई ४०००६३, मो.क्र. ९९२०९९९८४७, आधारकार्ड क्र. २९६८५३१२९१३८

----oooo----

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर गेल्या २५ वर्षापासुन आई हिच्यासोबत रहावयास आहे. मी दुकान क्र ०१ (२७ ग, १९८), फ्लायओवर सोसायटी, गोरेगाव मुलुंड लिंक रोड, गोरेगाव ईस्ट, मुंबई ४०००६३, या ठिकाणी श्रीमती कलावती हेमंत सावाला यांचे नावे असलेले शिधावाटप दुकान क्र. ०१ (२७ ग, १९८), फ्लायओवर सोसायटी, गोरेगाव मुलुंड लिंक रोड, गोरेगाव ईस्ट, मुंबई ४०००६३ या दुकानामध्ये मॅनेजर म्हणुन मागील गेल्या ०२ वर्षापासुन काम करतो. नमुद ठिकाणी मी ग्राहकांना राशन वाटणे व सदर शिधावाटप दुकानाच्या देखरेखीचे काम करतो. त्यावर मिळणाऱ्या उत्पन्नावर माझा व माझे कुटूंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

दिनांक. २३/०८/२०२५ रोजी सकाळी १०:०० वा चे सुमारास माझ्या वरील दुकानाचे पत्त्यावर रेशनिंगचा माल घेवुन वाहन क्र एम.एच १२ पी.क्यु ५५३४ हे आले होते. सदर वाहनामध्ये माझे दुकानाला पुरविण्यात आलेले ४०१५.८०० किलो तांदुळ वाहुन आणलेले होते. सदरचा माल मी मजुरांच्या सहाय्याने उतरवुन दुकानात ठेवत असताना त्या ठिकाणी डेप्युटी कंट्रोलर ऑफ रेशनिंग, कांदिवली पश्चिम यांचे मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या फिरत्या पथकाचे प्रमुख श्री. सचिन आत्राम हे दुकानावर आले. तेव्हा त्यांनी तांदुळ वाहुन आणणाऱ्या वाहनाचा जी.पी.एस का बंद आहे? तसेच रेशनिंगचा माल वाहनातुन उतरवताना त्या ठिकाणी रेशनिंग इन्स्पेक्टर हजर असणे आवश्यक असताना त्यांच्या गैरहजेरीत माल का उतरवला? असे प्रश्न विचारले. तेथे श्री. आत्राम यांनी माझा व संबंधीत वाहन चालकाचा जबाब जागेवर नोंद केला. त्यानंतर त्यांनी दुपारी २ वाजताच्या सुमारास स्थानिक रेशनिंग इन्स्पेक्टर श्री. शेलार, रेशनिंग इन्स्पेक्टर श्री. धर्मेश पटेल व स्थानिक असिस्टंट रेशनिंग ऑफिसर श्री. कसारे यांना फोन करून माझे दुकानावर बोलावले व श्री. शेलार यांचा देखील जबाब नोंद केला.

त्यानंतर दुपारी २:३० वाजताच्या सुमारास श्री. शेलार, श्री. धर्मेश पटेल व श्री. कसारे तेथुन निघुन गेले. तेव्हा श्री. आत्राम यांनी मला डेप्युटी कंट्रोलर रेशनिंग यांनी पाठवले असुन **"तु जी.पी.एस बंद ठेवुन माल मागविला व रेशनिंग इन्स्पेक्टरच्या अनुपस्थित माल उतरवला याबाबत तुझ्या विरूध्द कायदेशिर गुन्हा दाखल होवु शकतो. तो दाखल करायचा नसेल तर तुला मला व डेप्युटी कंट्रोलर रेशनिंग यांना २०,०००/- रूपये द्यावे लागतील, आणि जर तू सदरची रक्कम दिली नाहीस तर मी तुझ्या विरूध्द गुन्हा दाखल करेल"** त्यावर मी त्यांना सदर रक्कम कमी करण्याची विनंती केली परंतु ते रू २०,०००/- मागणीवर ठाम राहीले. त्यावेळी त्यांनी मला त्यांचा मोबाईल नंबर दिला व पैशाची पुर्तता झाल्यानंतर फोन करून भेटायला ये असे सांगितले.

मला श्री सचिन आत्राम यांना रु. २०,०००/- रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २५/०८/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहुन स्व:हस्ताक्षरात लेखी तक्रार केली. माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील स.पो.आ हरिदास किल्लेदार व पोलीस निरीक्षक नितीन थोरात यांची नेमणुक करण्यात आली.

दिनांक २६/०८/२०२५ रोजी मी दिलेले लेखी तक्रारीवर पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे मला सपोआ किल्लेदार यांनी सांगितले. त्यावरुन दोन पंचासमक्ष मी माझे मोबाईल क्र. ९९२०९९९८४७ वरुन लोकसेवक श्री. सचिन आत्राम यांचा मो.क्र. ९०८२३७०३२२ वर स्पिकर ऑन करुन कॉल केला. तेव्हा लोकसेवक सचिन आत्राम यांनी मला म्हणाले **"आज आ जाउ उधर"**.. तेव्हा मी म्हणालो

**''हा कभी आओगे''**.. तेव्हा लोकसेवक म्हणाले **''आज आज आ जाता हु दो बजे तक...** तेव्हा मी म्हणालो **''अ चार बजे आनाना मै दुकानपे रहता हु तभी के उसके पहिले आओगे''** तेव्हा लोकसेवक म्हणाले **''तु अभी किधर जा रहा है क्या''**...तेव्हा मी म्हणालो **''अभी तो निकल गया हु मै मै इसके लिए फोन किया कि आप किधर होगे क्या होगे क्या पता''**..तेव्हा लोकसेवक म्हणाले **''तो मै जरा दुसरे जगह पे था''**.. तेव्हा लोकसेवक म्हणाले **''हा तो पटालेंना चार बजे आ जाऊ आराम से''**..तेव्हा लोकसेवक म्हणाले **''ठिक है ठिक है''**.. परंतु त्यादिवशी लोकसेवक व माझी भेट झाली नाही.

त्यानंतर दिनांक २८/०८/२०२५ व दिनांक २९/०८/२०२५ रोजी सपोआ किल्लेदार यांनी पंचासमक्ष मला माझे मोबाईल क्र. ९९२०९९९८४७ वरुन व्हॉट्सॲपद्वारे लोकसेवक श्री. सचिन आत्राम यांना त्यांच्या मोबाईल क्र.९०८२३७०३२२ कॉल केला असता, लोकसेवक यांच्याशी संपर्क प्रस्थापित होवु शकला नाही.

त्यानंतर मी दिनांक ०१/०९/२०२५ रोजी ला.प्र.वि, वरळी, मुंबई कार्यालयात सपोआ किल्लेदार यांच्या दालनात समक्ष हजर झालो असता, ते मला पंचासह ला.प्र.वि, कार्यालयाच्या गोपनीय कक्षात घेवून गेले व त्यांना मला लोकसेवक यांना त्यांच्या मोबाईलवर संपर्क करण्यास सांगितले. तेव्हा मी माझा मोबाईल क्र. ९९२०९९९८४७ वरुन व्हॉट्सॲपद्वारे लोकसेवक श्री. सचिन आत्राम यांना त्यांच्या मोबाईल क्र.९०८२३७०३२२ कॉल केला असता, लोकसेवक यांनी कॉल उचलला नाही.

स.पो.आ किल्लेदार यांनी मला व पंच क्र. १ यांना लोकसेवक यांच्या भेटीकरीता त्यांच्या कार्यालयास पाठविले असता, त्यावेळी माझे व लोकसेवक श्री आत्राम यांचेमध्ये झालेले संभाषण पुढील प्रमाणे. त्यावेळी मी म्हणालो ''**फाईनल कुछ बोले क्या तुम बोलके आऐ थे क्या**, तेव्हा लोकसेवक आत्राम म्हणाले, ''**सरने तो इसम भी फाइनल बोला था, तो मैने ही वो बोला उतना नही है। आदमी इतना बोला था, डिसीआर साहबने, अशी चर्चा करतेवेळी** मी म्हणालो, **पराया दुकानदार था कि कुछ .......पंधरा नही लोगे**, त्यावेळी लोकसेवक आत्राम म्हणाले, **मैने बोला उतना कर दे ......मैने ज्यादा बोला भी नही तुजसे**, तेव्हा मी म्हणालो, **ज्यादा ही है वो...** अशी चर्चा करतेवेळी मी म्हणालो **करोना पंधरा बोलोना क्या गलत**, तेव्हा लोकसेवक आत्राम म्हणाले, **भाई मानाही नही तो क्या बताऐ मै ही रिजन गया था मालुम है... मै बोला होल्डपे लेकर कम से कम बीसतक** ... तेव्हा मी म्हणालो, **बीस हजार कुछ माईने रखता है, सर बोलाना कुछ फॉल्ट नही था बीस हजार मागा दुकानदार किधरसे देखा**.. असे संभाषण करुन मी लोकसेवक आत्राम यांस म्हणालो, **मै आता हु एटीएम जाके लेके दस मिनीटमे आया, तो भी रहे तो एकबार पुछलो**... तेव्हा लोकसेवक आत्राम म्हणाले **हा**.. असे संभाषण करुन मी, पंच श्री शिवाजी भुरके असे ऑटो रिक्षाने परत पोलीस वाहनाजवळ आलो. सदर संभाषण डिजिटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आलेले आहे.

सपोआ किल्लेदार यांनी मला व पंचांना आलोसे यांच्याशी झालेले संभाषण ऐकून पडताळणी झाल्याची खात्री केल्यानंतर सापळा पथकास व पंचास सापळा तसेच मला कारवाईच्या दृष्टिने सुचना दिल्यात. त्यानंतर मी, पंच श्री भुरके यांचे सोबत लोकसेवक श्री आत्राम यांचे कार्यालयास आलो असता, कार्यालयाच्या बाहेर असलेल्या रोडच्या कडेवरील चहाच्या टपरीजवळ लोकसेवक आत्राम उभे होते. तेव्हा मी त्यांना जावुन समोर भेटलो व चहा पिण्याबाबत विचारणा केली. त्यानंतर मी म्हणालो ''**अंदर दु क्या इधर ही दे दु...** तेव्हा लोकसेवक आत्राम म्हणाले, '**दे दे इधर ही दे**... असे संभाषण झाल्यांनतर मी माझे पॅन्टच्या उजव्या खिश्यातुन सफेद रंगाच्या कागदामधील लाच रक्कम लोकसेवक आत्राम यांचे समोर धरली असता, तेव्हा लोकसेवक आत्राम यांनी उजव्या हाताने लाच रक्कम स्विकारुन ती डाव्या हातात ठेवली व डाव्या हाताने सफेद रंगाच्या कागदामधील लाच रक्कम पॅन्टच्या पुढील बाजुस असलेल्या डाव्या खिश्यामध्ये ठेवली. त्यावेळी मी चहाच्या टपरीच्या बाजुस येवुन मोबाईलवर सापळा पथकास व्हाटसॲप ग्रुपवर लोकसेवक आत्राम यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबत पुर्वनियोजीत इशारा म्हणुन थम इमोजी केला. तेव्हा चहा टपरी व रस्त्यालगत उभे असलेल्या

सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी लोकसेवक आत्राम यांना ताब्यात घेतले. त्यांनतर स.पो.आ. किल्लेदार यांच्या सुचनेवरुन पोह.गायकवाड यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

माझा श्री. सचिन आत्राम यांचेशी कोणताही वैयक्तिक आर्थीक देवाण - घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. लोकसेवक श्री सचिन बळीराम आत्राम, वय ३८ वर्षे, व्यवसाय : शिधावाटप निरीक्षक (उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय, ग परिमंडळ, कांदिवली पश्चिम, मुंबई) यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करून, स्वत:च्या आर्थिक फायदयाकरीता माझ्या राशन दुकानावर आलेल्या माल वाहनाचा जी.पी.एस का बंद आहे? तसेच रेशनिंगचा माल वाहनातुन उतरवताना त्या ठिकाणी रेशनिंग इन्स्पेक्टर हजर असणे आवश्यक असताना त्यांच्या गैरहजेरीत माल का उतरवला? याबाबत कारवाई न करण्याकरीता माझ्याकडे २० हजार रूपये लाचेची मागणी करुन ती स्विकारतांना त्यांना लाप्रवि, वरळी, मुंबई येथील पथकाने जागीच ताब्यात घेतले आहे. म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील जबाब माझे सांगणे प्रमाणे मराठीत संगणकावर टंकलिखीत केलेला असून, मी वाचून पाहिला असता, माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

( हरिदास किल्लेदार)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, वरळी, मुंबई

रानु भवरलाल प्रजापती
02/08/2024

दाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........................ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

....................................................................................................

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........................................

Total Value of properties stolen / involved

चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........................................

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फि.र हे कांदिवली येथील शिधावाटप दुकानामध्ये मॅनेजर पदावर काम करतात दि. 23/08/2024 रोजी फि. यांच्या दुकानावर ट्रक मधुन माल उतरविण्याचे काम चालु असताना लोकसेवक तेथे येऊन ते फिरत्या पथकाचे निरीक्षक असल्याचे सांगितले. सदर गाडीचा जीपी एस बंद का आहे व शिधावाटप निरीक्षक हजर नसताना सामान का उतरविले अशी विचारणा करुन फि. यांना तुमच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतो असे सांगुन गुन्हा दाखल करावयाचा नसल्यास लोकसेवक [illegible] आजाम यांनी स्वतःसाठी व डेप्युटी कलेक्टर रेशनिंग यांचेसाठी फि. यांचेकडे 20,000/- रकमेची मागणी केली. सदर लाचरक्कम स्विकारताना त्यास [illegible] कारवाई दरम्यान त्यांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणुन त्यांचेवर कलम 7 भ्र.प्र.अधि. 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या ........................

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................................

(3) Transferred to P. S. ..................................
District .................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा 02/08/2024

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

नाव Name ........ हरिदास किलेदार

हुद्दा Rank ........ सहायक पोलीस आयुक्त

तपासिक अ. ब. क्र. ........................................

Posting

Code No. of ........................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........................

1. Date and time of submitted to the Court ........................

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधिक्षक ( संगणक ) | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report